दैनिक

अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १६७ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.१७ सप्टेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com


## मुंबई-गोवा महामार्गावर अपघात : १ ठार

**दै.रायगड नगरी । पेण**

मुंबई गोवा महामार्गावर वाशी नाका येथे झालेल्या ट्रेलर व मोटरसायकलच्या अपघातात मोटर सायकल स्वार जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

याबाबत सविस्तर हकीगत अशी की, मुंबई गोवा महामार्गावरून प्रकाश महादू पाटील वय (४९) रा. कोपर पोस्ट जोहे हे आपल्या मोटरसायकल क्रमांक MH-06-B-5988 वरून सकाळी ९:३० च्या सुमारास जात होते. वाशी नाका येथे त्यांना पाठीमागून येणाऱ्या ट्रेलर क्रमांक RJ-19-GG- 2942 ने जोरदार धडक दिली. त्यामुळे झालेल्या अपघातात प्रकाश पाटील यांचा जागीच मृत्यू झाला. ट्रेलर चालकास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

# राज्य सरकार गृहपाठ बंद करण्याचा निर्णय घेण्याच्या तयारीत

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**राज्यात शिंदे फडणवीस सरकार आल्यानंतर विविध विभागांमध्ये महत्वाचे निर्णय घेतले जात असल्याचे पाहायला मिळत आहे. दहीहंडी, गणेशोत्सव काळात आपण असे अनेक निर्णय पाहिले. दरम्यान शिक्षण विभागात देखील एक ऐतिहासिक निर्णय होत आहे. शालेय विद्यार्थ्यांना दिला जाणार होमवर्क आता बंद होणार आहे. राज्य सरकारने यासंदर्भात निर्णय घेण्याच्या तयारीत आहे.**




विद्यार्थी आणि पालकांसाठी अत्यंत महत्वाची बातमी आहे. विद्यार्थ्यांना शाळेतून मिळणार होमवर्क आता बंद होण्याची शक्यता आहे. शालेय शिक्षणमंत्री दिपक केसरकर यांनी यासंदर्भात माहिती दिली आहे. लवकरच तज्ञांशी चर्चा करुन याबद्दल अंतिम निर्णय घेणार असल्याचे त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

गृहपाठ बंद करण्याचा राज्य सरकार विचार करत आहे. पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचा होमवर्क घेणे हे पालकांसाठी जिकरीचे असते. अशावेळी होमवर्क बंद झाल्यास पालकांचा ताण कमी होऊ शकतो असे म्हटले जात आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून या निर्णयाची अंमलबजावणी केली जाऊ शकते.

मुलांना ताण देऊ नये. त्यांच्या मेंदुचा विकास व्हायला दिला पाहीजे. होमवर्क ही टिचर्ससाठी पळवाट असू नये. आपण अर्धा तास जे शिकवतो ते एवढ एकाग्र होऊन शिकवलं पाहीजे की मुलांना होमवर्क करण्याची गरज लागू नये असे शालेय शिक्षणमंत्री दिपक केसरकर म्हणाले. हे माझे वैयक्तिक मत असून मी याविषयी शिक्षक संघटना, संस्था चालकांशी बोलून नंतर यावर निर्णय घेईन असे शालेय शिक्षणमंत्री म्हणाले.

दुसरीकडे होमवर्क नसेल तर विद्यार्थी घरी देखील अभ्यास करणार नाहीत. त्यामुळे या निर्णयाला विरोध देखील होण्याची शक्यता आहे. यावर पालक आणि तज्ञांकडून काय प्रतिक्रिया येतात हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## मुसळधार पावसाने पनवेलकरांना झोडपले; नद्या-नाले तुडुंब भरले



**दै.रायगड नगरी । पनवेल**

**गेल्या २४ तासापासून पडत असलेल्या मुसळधार पावसाने पनवेलकरांना चांगलेच झोडपले असून अनेक ठिकाणी पाणी तुंबण्याचे प्रकार त्याचप्रमाणे वाहतूक कोंडी झाल्याचे पाहायला मिळाले.**

पनवेल, नवी मुंबई परिसरात गेल्या २४ तासापासून पावसाचा जोर वाढला आहे. त्यामुळे सखलभागात पाणी साचण्यास सुरुवात झाली आहे. गाढेश्वर धरण सुद्धा तुडुंब भरून वाहत असल्याने प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. गाढी नदीने सध्यातरी इशारा पातळी ओलांडली नाही मात्र असाच पाऊस पडत राहिल्यास पातळी ओलांडू शकत असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

अनेक नदी व नाले परिसरातून पाणी वेगाने वाहत असल्याने महानगरपालिका व शासकीय यंत्रणा घडामोडींकडे लक्ष ठेवून आहे व परिसरात कोठेही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस यंत्रणा, अग्निशमक दल व आपत्कालीन पथक सज्ज आहे. या पावसाचा फटका चाकरमान्यांना पडला असून एस.टी बसेस, एनएमएमटी च्या बसेस वाहतूक कोंडीमुळे धीम्या गतीने होत आहे. दरम्यान कोकण किनारपट्टी, मध्य महाराष्ट्राच्या घाट भागात जोरदार पाऊस पडत आहे. शनिवारी अशीच परिस्थिती कायम राहणार आहे.

अरबी समुद्रापासून मध्य आणि पूर्व भारताच्या दिशेने वारे वाहत आहेत. त्यामुळे पावसाचे प्रमाण अधिक आहे, अशी माहिती हवामान विभागाकडून देण्यात आली.

## वाढत्या खड्ड्यांमुळे नागरिक बेजार, वाहतूक कोंडीने झाले हैराण



**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल उड्डाणपुलावर मोठ मोठे खड्डे पडल्याने प्रवास करताना नागरिकांचा जीव मेटाकुटीला आला आहे. या खड्ड्यांमुळे वाहनांचा वेग मंदावतो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते.

नवीन पनवेल ते पनवेलला जोडणाऱ्या उड्डाणपुलावर चढताना व गाड्या उतरताना खड्ड्यांची रांगोळी सुरू झाली आहे. त्यामुळे खाली व वर जाताना तीन ते चार सिग्नल पडतात. यात इंधन देखील वाया जाते. व नागरिकांचा वेळ देखील जातो. याकडे स्थानिक नगरसेवक, लोकप्रतिनिधी यांचे दुर्लक्ष होताना दिसून येत आहे. दरवर्षी पावसाळ्यात येथे खड्डे पडून खोळंबा होतो. मात्र याकडे प्रशासन गांभीर्याने पाहत नाही. तर दुसरीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येणारा माथेरान रोड येथील सुकापूर–भगतवाडी येथे पडलेल्या खड्ड्यांनी प्रवासी पुरते हैराण झाले आहेत. चिपळे येथील रस्त्यावर देखील खड्डे पडले आहेत. त्यामुळे वाहन चालवायचे …/२


## उरणमध्ये पावसामुळे जनजीवन विस्कळीत

**दै.रायगड नगरी । उरण**

गेली दोन दिवस विजेच्या कडकडाट व वादळीवाऱ्यासह पाऊस पडत असल्याने उरण तालुक्यातील जनजीवन विस्कळित झाले आहे. अतिवृष्टीमुळे मासेमारी करणाऱ्या बोटींना समुद्रात धोका निर्माण होऊ शकतो या खबरदारीमुळे करंजा, मोरा, दिघोडे, केळवणे या ठिकाणावरील कोळी बांधवांनी ९० टक्के बोटी किनाऱ्यावर नांगरुन ठेवल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

दहा दिवसांच्या बाप्पाला निरोप दिल्यानंतर उरण तालुक्यातील करंजा, मोरा, दिघोडे, केळवणे परिसरातील अनेक मासेमारी करणाऱ्या बोटींनी समुद्रात जाणे पसंत केले होते. त्यामुळे मच्छी मार्केट मध्ये मासळीची आवक वाढली होती.त्यातच उपासातील श्रावण संपल्याने मासे खवय्यांनी आपला मोर्चा हा मच्छी मार्केट मध्ये वळविला होता. मात्र विश्रांती घेतलेल्या पावसाने दमदार हजेरी लावल्याने शेतकरी राजा सुखावला असताना ढगांच्या गडगडाट, विजेच्या कडकडाट सह वादळीवाऱ्यासह पाऊस कोसळत असल्याने उरण तालुक्यातील जनजीवन सध्या विस्कळित झाले आहे.

मात्र वादळीवाऱ्यासह येणाऱ्या पावसाचा तडाखा हा गबाशयाला आलेल्या भात पिकास बसत असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. तर समुद्रात ही मासेमारीसाठी गेलेल्या बोटींना वादळीवाऱ्याचा व उसळणाऱ्या समुद्रातील लाटांचा तडाखा बसत असल्याने कोळी बांधवांनी मासेमारी करणाऱ्या बोटी किनाऱ्यावर नांगरुन ठेवण्यात सुरक्षित मानले आहे. त्यामुळे पुढील दिवसात समुद्रातील माशांची आवक ही मच्छी मार्केट मध्ये घटनार असल्याचे करंजा मच्छीमार सहकारी सोसायटीचे संचालक हेमंत गौरीकर यांच्या कडून सांगण्यात येत आहे.




## एमजीएम रूग्णालयासमोरील अनधिकृत टपऱ्यांवर अतिक्रमण कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहर सौंदर्यीकरण अभियानांतर्गत या ठिकाणी वृक्षारोपण करून सौंदर्यीकरण करण्यात येणार आहे. या अंतर्गत पनवेल महानगरपालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्या आदेशानूसार एमजीएम रूग्णालयासमोरील अनधिकृत टपऱ्यांवर महापालिकेने अतिक्रमण कारवाई केली.

पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती क मधील एमजीएम कामोठे रूग्णालयासमोर समोर अनधिकृतरित्या सुरू असलेले व्यवसाय, उभारलेले शेड, टपऱ्या निष्कसित करण्यात आल्या. सदर कारवाईवेळी उपायुक्त कैलास गावडे, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे , प्रभाग 'ब'चे प्रभाग अधिकारी सदाशिव कवठे , प्रभाग 'क' चे प्रभाग अधिकारी अरविंद पाटील व प्रभाग 'ब' आणि 'क' चे अतिक्रमण पथक उपस्थित होते. यावेळी जेसीबीच्या साहाय्याने अनधिकृतरित्या उभारलेल्या टपऱ्यांवरती तोडक कारवाई करण्यात आली. तसेच त्यांचे सामान जप्त करण्यात आले.




## विरार - अलिबाग कॉरीडोर बाबत शेतकऱ्यांच्या शासनाला हरकती सादर

**दै.रायगड नगरी । उरण**

विरार – अलिबाग कॉरीडोर बाधित शेतकऱ्यांना पनवेल उपविभागिय अधिकारी राहुल मुंडके यांनी कॉरीडोर संदर्भात भुसंपादनाविषयी नोटीस काढली होती. त्या नोटीसी बाबत विरार–अलिबाग कॉरिडोर शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके यांच्याकडे शेतकऱ्यांच्या वतीने काल संबंधित नोटीसी विरोधात हरकती दाखल करण्यात आल्या.

विरार –अलिबाग कॉरीडोर हा शासनाचा बहुउद्देशिय प्रकल्प उरण मधील पूर्व विभागातून जात आहे.त्यामूळे अनेक शेतकऱ्यांनी राखलेल्या आपल्या पूर्वजांच्या जमिनी संपादीत होणार आहेत. त्यामुळे येथील शेतकरी उद्धवस्त होणार आसून या गावांनाही या कॉरिडोरमूळे मोठा धोका निर्माण होणार आहे. त्यामुळे येथील शेतकऱ्यांनी या भूसंपादनास विरोध दर्शवीत आपल्या हारकती दाखल केल्या आहेत. यावेळी शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष संतोष ठाकूर, रमण कासकर, कॉ.शेखर ठाकूर, मोहिते, सचिव, रविंद्र कासुकर, रमेश पाटील, इत्यादी पदाधीकारी व शेतकरी उपस्थीत होते.



# पदयात्रा आणि पडझड

भारतीय जनता पक्षाने काँग्रेस पक्ष जमेल तितका दुर्बळ करण्याचा पण केलेला दिसतो. राहुल गांधी यांनी कन्याकुमारी येथून 'भारत जोडो' यात्रा सुरू केली आहे. ती दीडशे दिवस चालणार असून १२ राज्ये तसेच दोन केंद्रशासित प्रदेशांमधून जाणार आहे. ही साडेतीन हजार किलोमीटर अंतराची यात्रा निवडणूक होऊ घातलेल्या गुजरातमध्ये जाणार नाही किंवा केंद्रीय सत्तेचे गणित ठरविणाऱ्या उत्तर प्रदेशात कमी काळ राहणार, याबद्दल पक्षात नाराजी आहे. दुसरीकडे, राहुल यांनी केरळला खूप जास्त दिवस दिल्याने तिथला सत्ताधारी मार्क्सवादी पक्ष नाराज आहे. हे चालू असताना गोव्यातील ११ काँग्रेस आमदारांपैकी आठ भाजपमध्ये गेले आहेत. तेथे दुसऱ्यांदा भाजप सरकार आल्यापासूनच काँग्रेस फुटणार असल्याची चर्चा होती. अखेर, काँग्रेसमधली पाच वर्षांतील तिसरी फूट पडली. गोव्यात पक्षांतर हे वेषांतराइतकेच सहज व नैसर्गिक असते. फक्त आता पक्षांतरबंदी कायद्यामुळे आवश्यक तितके आमदार गोळा करावे लागतात. राहुल गांधी यांच्या यात्रेवर लक्ष केंद्रित केलेल्या काँग्रेस नेत्यांना या घडामोडी समजत नव्हत्या का आणि त्या रोखण्यासाठी त्यांनी काय केले; या प्रश्नांना तर काही अर्थच राहिलेला नाही. कारण हाच प्रश्न ज्योतिरादित्य शिंदे यांच्यापासून गुलाम नबी आझाद यांच्यापर्यंत सर्वांबाबत विचारता येईल. राहुल यांची 'भारत जोडो' यात्रा सुरू झाली तेव्हा चंद्रशेखर यांच्यापासून कुणी कुणी पदयात्रा काढल्या आणि त्यातून राजकारणाला कसे वेगळे वळण लागले, याचे दाखले दिले गेले. ते उत्साह वाढविणारे असले तरी मुळात जो पक्ष शिल्लक आहे, राज्याराज्यात जे लोकप्रतिनिधी आहेत, त्यांना टिकवून धरण्यात अपयश का येते आहे, याचा मुळातून विचार करण्यास काँग्रेसनेते तयार नाहीत. त्यामुळे, जयराम रमेश यांनी केवळ सत्ताधाऱ्यांवर तोंडसुख घेऊन काय होणार? 'इकडे तुम्ही यात्रा काढताय आणि तिकडे तुमचे आमदार निघून जात आहेत,' असे कुणी म्हटले तर त्याला काय उत्तर देणार? विशेष म्हणजे, गोव्यात विधानसभा निवडणूक झाली तेव्हा काँग्रेसच्या सर्व उमेदवारांनी राहुल गांधी यांच्या उपस्थितीत 'मी आमदार म्हणून निवडून आलो तर पाच वर्षे काँग्रेसचे काम करीन. कोणत्याही स्थितीत पक्ष सोडणार नाही,' अशी शपथ घेतली होती. उमेदवार मंदिरे आणि चर्चमध्ये जाऊनही हे म्हणत होते. मग त्यांनी आता सत्ताधारी बाकांवर उडी घेण्याचे कारण काय? याचा अर्थ, राज्या-राज्यांतले लोकप्रतिनिधी आणि काँग्रेसचे वरिष्ठ नेते यांच्यात संवादाचा काही पूलच राहिलेला दिसत नाही. 'वरिष्ठ नेते' असे नुसते म्हणायचे. काँग्रेसमधील प्रत्येक लोकप्रतिनिधी किंवा नेत्याला 'गांधी कुटुंब' हेच पक्षाचे सर्वोच्च आणि खरे नेतृत्व आहे, हे माहीत असतेच. त्यांच्याशी संवाद न होता नेते असे पक्ष सोडत असतील तर केवळ या यात्रेतून पक्षाला नवी उभारी मिळेल का, हा प्रश्न गोव्यातील पक्षांतराने पुढे आला आहे. महाराष्ट्र विकास आघाडीचे सरकार गेले, तेव्हा महाराष्ट्रात काँग्रेसचा सत्तेतील जो काही वाटा होता, तो गेला. ठाकरे सरकार जाण्याच्या आधीपासूनच काँग्रेसचे किती आमदार फुटणार आणि भाजपमध्ये जाणार, याची चर्चा सुरू झाली. ती आजही चालू आहे. अनेक काँग्रेस नेत्यांच्या इन्कारात दम नाही. अशा अनेक प्रदेश शाखा अस्वस्थ किंवा अस्थिर असतील तर पक्ष पुन्हा उभा करण्यासाठी पदयात्रेशिवाय बऱ्याच कल्पक गोष्टी वेगाने कराव्या लागतील. काँग्रेसला नवा, पूर्णवेळचा अध्यक्ष मिळणे, पक्षाची संघटनात्मक बांधणी तळातून नव्याने करणे आणि मुख्य म्हणजे देशभरातील छोटे नेते, कार्यकर्ते आणि सहानुभूतीदार यांचे मनोबल टिकविणे व मजबूत करणे; ही खरी आव्हाने आहेत. 'भारत जोडो' यात्रा ही आव्हाने पेलण्यासाठी पुरेशी आहे का, याचे आत्मपरीक्षण काँग्रेस नेत्यांनीच करायला हवे. राहुल गांधी यांच्या यात्रेचे स्वागत करतानाच अशी यात्रा डॉ. मनमोहन सिंग यांचे दुसरे सरकार असतानाच का निघाली नसेल, अशी शंका येते. पक्ष सत्तेत असतानाच तो अधिक मजबूत करायचा असतो, हे सध्या ठायी ठायी दिसणारे उदाहरण कळावे, इतके बुद्धिमान नेते काँग्रेसमध्ये तेव्हा होते आणि आजही आहेत. ज्या केरळमधून राहुल यांनी यात्रा सुरू केली आहे, तेथील ज्येष्ठ काँग्रेस नेते ए. के. अँटनी यांनी पक्षाच्या पराभवानंतर एक विस्तृत अहवाल दिला होता. त्यात अनेक महत्त्वाच्या सूचना होत्या. काँग्रेसचा 'सेक्युलर तोल' ढळला आहे का, असेही अँटनी यांनी त्यात नेमकेपणाने विचारले होते. या अहवालावर चर्चा झाली पण कृतीत काहीही आले नाही. आज पक्ष सावरण्यासाठी पदयात्रा हे एक पाऊल असले तरी पक्षाची पडझड रोखण्यासाठी ती पुरेशी आहे का, हा सवाल उरतोच. त्याचे उत्तर राहुल गांधी यांनाच द्यावे लागेल आणि तेही वेळ न दवडता. राहुल गांधी यांनी पक्षाच्या अध्यक्षपदाचा निर्णय तसाच अर्धवट ठेवूनच पक्षाच्या कामात पुढाकार घेतला आहे. यातून तेच पक्षाचे सर्वोच्च नेते आहेत, हेच अधोरेखित होते. असे असेल तर पुढे येऊन पक्षाचे अध्यक्षपद स्वीकारणे आणि पक्षाला नवी दिशा देणे आवश्यक आहे. देशव्यापी पदयात्रा काढायची आणि अध्यक्षपद मात्र स्वीकारायचे नाही, यातला अंतर्विरोधही राहुल गांधी यांनी आता संपवावा.

# शेतकऱ्यांसाठी अलिबाग एमआयडीसी कार्यालयावर धैर्यशील पाटील यांनी दिली धडक

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**



राज्याच्या सत्ता संघर्ष नाट्यात शेतकरी बळीराजा अक्षरशः मेटाकुटीला आला आहे सरकारच्या घोषणा अनेक मात्र त्याची कोणतीच अमलबजावणी नाही महागाईवर महागाई त्यात बळीराजा पूर्णतः खचून गेला आहे त्याच्या भाताला कवडी मोलाची किंमत याला जबाबदार कोण त्यातच रोहा तालुक्यातील कोलाड पाटबंधारे विभागाचा अंदाधुंदी कारभार गेली पाच वर्षे पुगाव, पुई,येथील शेतकऱ्यांना पाटबंधारे विभाग शेतीची नुकसानभरपाई देत नाही याचा पाठपुरावा म्हणून पेण रोहा सुधागड शेकापचे माजी आमदार तथा शेतकऱ्यांचे नेते धैर्यशील दादा पाटील यांनी सदरील शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आक्रमक होत अलिबाग येथील एम आय डी सी कार्यालताय धाव घेत संबधित अधिकारी व अभियंता यांना धारेवर धरत जाब विचारत शेतकऱ्यांना ताबतोब त्यांच्या नुकसानीची भरपाई द्या अशी जोरदार मागणी केली.

कोलाड पाटबंधारे खात्याकडून बारमाही पाणी हा आर सी एफ कारखाण्यासह अन्य कारखान्यांना पुरविला जातो त्यामुळे त्यांच्या गळतीमुळे खालील शेतकऱ्यांना उन्हाळी भात शेती लागवड करता येत नाही अथवा त्याचे मोठे प्रमाणावर नुकसान होत असल्याने याबाबत गुरवार दिनांक १५/९/२०२२ रोजी एम.आय.डी.सी कार्यालय अलिबाग येथे कुंडलिका उजव्यातीर कालव्याच्या गळतीमुळे रोहा तालुक्यातील मौजे पुगाव, मढाली बु व पुई येथील शेतकऱ्याच्या झालेल्या उन्हाळी भातशेतीची सन २०१८ ते २०२२ या वर्षाची गेली पाच वर्षांपासून नुकसान भरपाईच पाटबंधारे खात्याकडून मिळाली असल्याने सदरच्या शेतकऱ्यांना न्याय व त्यांच्या पाटबंधारे खात्याच्या गळक्याने झालेल्या नुकसान यांची भरपाई मिळावी याकरीता अलिबाग येथील एम आय डी सी चे वरिष्ट अभियंता यांना धारेवर धरत नुकसानभरपाईची मागणी केली आहे. यावेळी शेकापचे माजी आमदार धैर्यशील दादा पाटील यांनी सदरील शेतकऱ्यांची झालेली नुकसानीचा पाढा वाचत त्यांच्या बाजूने सविस्तर माहिती देत चर्चा केली.यावर एम आय डी सी कार्यकारी अभियंता यांनी सांगितले कि सदर नुकसान भरपाई मिळावी याबाबतचा प्रस्ताव आमच्या कार्यालया कडून दिनांक ८जून २०२२ रोजी वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविला असुन १५आक्टोबर २०२२ पर्यंतची ही नुकसान भरपाईची रक्कम रुपये १२४१२९४५/- तहसीलदार रोहा यांच्याकडे जमा होईल असे आश्वासन प्रसंगी नुकसानग्रस्त शेतकरी वर्ग समावेत माजी आमदार धैर्यशील पाटील यांना कार्यकारी अभियंता यांनी दिले.

यावेळी माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्या समवेत कुणबी समाजनेते व रोहा तालुका शेतकरी कामगार पक्षाचे जेष्ठ नेते शंकरराव म्हसकर,मुठवली सोसायटीचे चेअरमन गणेश म्हसकर, व शेतकरी वर्ग व एम आय डी सी चे कार्यकारी अभियंता संजय ननवरे व उपअभियंता संतोष माने (पाणीपुरवठा ) हे उपस्थित होते. अलिबाग एम आय डी सी कार्यकारी अभियंता यांच्याकडे रोहा शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची मागणी करतांना शेतकऱ्यांचे नेते तथा शेकापचे माजी आमदार धैर्यशील पाटील शंकरराव म्हसकर व शेतकरी तसेच उपस्थित अधिकारी दिसत आहेत.



पनवेलमधील सुमेध संजय कदम हा तरुण लंडनमधील ऑक्सफोर्ड ब्रुक्स युनिव्हर्सिटी हेडिंगटन येथे एमएससी, ऑटोमोटिव्ह इंजिनिअरिंग विथ इलेक्ट्रिक वेहिकल्स या कोर्सचे उच्च शिक्षण घेणार आहे. त्या अनुषंगाने आज (दि. १६) पुढील यशस्वी वाटचालीकरिता भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी सुमेधला शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजपचे रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, सुमेधचे वडील संजय कदम उपस्थित होते.

# संततधार पावसामुळे झाड मुळापासून उखडून पडले ; जीवित हानी नाही



**दै.रायगड नगरी । कर्जत**

दोन दिवस संततधार पडणाऱ्या पावसामुळे कर्जत शहरातील एक झाड मुळापासून उखडून गाडीवर पडले आहे, यामुळे गाडीचे नुकसान झाले आहे, सुदैवाने जीवित हानी टळली आहे.

संततधार पडणाऱ्या पावसामुळे नगरपरिषद क्षेत्रातील मुद्रे परिसरात गवणी रस्त्यावर आज सायंकाळी एक झाड मुळापासून उखडून गाडीवर पडले आहे गाडीचे नुकसान झाले असून जीवित हानी टळली आहे.

# जागृत युवकाने दानपेटी चोरीचा प्रयत्न हाणला पाडून

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर सेक्टर - ११ मधील महाकाली माता मंदिरातील दानपेटी चोरी करुन पलायनाच्या तयारीत असताना एका जागृत युवकामुळे चोराचा प्रयत्न फसला. मात्र, सदर युवकास चोराची मोटार सायकल पकडण्यात यश आल्याची घटना खारघर मध्ये घडली. दानपेटी आणि मोटारसायकल पोलिसांनी ताब्यात घेतली आहे.

खारघर सेक्टर - ११ मध्ये असलेल्या महाकाली माता मंदिरात कोणीही नसल्याची संधी साधून मंदिरातील दानपेटी फोडण्याचा प्रयत्न चोरटा करीत होता. यावेळी मंदिराजवळून खारघर सेक्टर - १२ मध्ये जाणाऱ्या अजय इंगळे यास मंदिरातून आवाज आला. दानपेटी फोडण्यात यश न आल्याने चोरटा दानपेटी घेवून मंदिराबाहेर पडण्याच्या तयारीत असताना, दानपेटी कुठे घेवून जात आहे, अशी विचारणा अजय इंगळे याने सदर चोरट्यास केली. मात्र, चोर समोरुन दमदाटी करु लागल्याने अजय इंगळे याने सतर्कता बाळगून चोराने आणलेल्या मोटार सायकलची चावी काढून घेतली. त्यानंतर अजय इंगळे पोलिसांना फोन करीत असल्याचे चोराच्या निदर्शनास येताच चोरट्याने दानपेटी आणि मोटार सायकल तिथेच सोडून पलायन केले. या घटनेची माहिती मिळताच खारघर पोलिसांनी घटनास्थळी भेट देवून दानपेटी आणि मोटार सायकल ताब्यात घेतली. दरम्यान, खारघर सेक्टर ११ परिसरात चोरीच्या घटना वाढत आहेत. उद्यानातील पथदिवे बंद असल्यामुळे प्रेमी युगुलांचा सुळसुळाट झाला आहे. पनवेल महापालिका आणि सिडको प्रशासनाने खारघर सेक्टर- ११ परिसरातील बंद असलेले पथदिवे सुरु करण्याची पोलिसांनी गस्त वाढविण्याची आवश्यकता आहे, असे खारघर सेक्टर - ११ मधील नागरिकांनी सांगितले.

# विक्रांत पाटील यांची भारतीय जनता पार्टी राज्य कार्यकारिणीच्या सरचिटणीसपदी निवड

**दै.रायगड नगरी । पनवेल**



भारतीय जनता युवा मोर्चाचे महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी दैदीप्यमान कामगिरी करणारे विक्रांत बाळासाहेब पाटील यांची भारतीय जनता पार्टीच्या महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीच्या सरचिटणीस पदी निवड झाली आहे.ओघवती वक्तृत्व शैली, तळागाळातील कार्यकर्त्यांनसोबत अस-लेला कनेक्ट, ज्येष्ठ नेत्यांनी सोपविलेली जबाबदारी परिपूर्ण पणे पार पाडणे, आणि पक्षाच्या विचारधारेवर असलेली अगम्य निष्ठा या शिदोरीच्या जोरावर विक्रांत बाळासाहेब पाटील यांचा राजकीय प्रवास आचंबित करायला लावतो.

नियुक्तीपत्र प्राप्त झाल्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना विक्रांत पाटील म्हणाले की ज्येष्ठ नेत्यांनी माझ्यावर विश्वास दाखवून जी जबाबदारी मला दिली आहे ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करेन. माझ्यासाठी पद हे कधीही महत्त्वाचे नसते तर त्या पदावर विराजमान झाल्यानंतर येणारी जबाबदारी पार पाडणे हेच मी कायम माझ्या डोळ्यापुढे ध्येय ठेवत आलो आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नेहमीच मला चांगली संधी उपलब्ध करून दिलेली आहे. राज्याचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासारखे मोठी उंची असलेले नेतृत्व त्यांच्या टीम मध्ये मला काम करायची संधी देते ही माझ्यासाठी निश्चितच अभिमानाची बाब आहे. मी या दोन्ही दिग्गज नेत्यांचे आभार मानतो तसेच राज्य कार्यकारिणीचे पूर्व अध्यक्ष चंद्रकांत दादा पाटील यांच्या कार्यकाळात मी भाजयुमो प्रदेश अध्यक्ष म्हणून कार्यरत असताना त्यांनी मला नेहमीच ताकद दिली, ऊर्जा प्रदान केली महाराष्ट्रभर फिरण्यासाठी संधी प्राप्त करून दिली. त्यामुळेच आज या पदावर काम करायची मला संधी मिळत आहे म्हणून मी त्यांचे देखील आभार मानतो.

सुधीर भाऊ मुनगंटीवार, आशिष शेलार, प्रविण दरेकर,पंकजा ताई मुंढे यांच्यासह सगळ्याच नेत्यांनी मला सर्वोत्कृष्ट काम करून दाखविण्यासाठी संधी प्राप्त करून दिली. आमदार प्रशांत दादा ठाकूर, महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते परेश ठाकूर यांचे अमूल्य असे सहकार्य सातत्याने लाभत असते. ते पुढे म्हणाले की,फक्त देशाचेच नव्हे तर जगाचे शीर्ष नेतृत्व करत असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टी एक सक्षम राजकीय पक्ष म्हणून जनमानसात स्थान मिळवत आहे. आता जबाबदारी वाढलेली आहे. माझे पिताश्री बाळासाहेब पाटील यांचे आशीर्वाद आणि मार्गदर्शन सातत्याने माझ्या पाठी असतात नेते मंडळींनी माझ्यावर दाखविलेला विश्वास, ज्येष्ठांचा आशीर्वाद मिळणारे मार्गदर्शन या सगळ्यांच्या जोरावरती सुदृढ राष्ट्रनिर्मिती,संघटन सक्षमीकरण यासाठी मी कटीबद्ध असेन. भारतीय जनता युवा मोर्चाचे सचिव म्हणून विक्रांत पाटील यांनी यापूर्वी तीन वर्षे जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली आहे. पनवेल महानगरपालिकेचे उपमहापौर म्हणून देखील त्यांची कारकीर्द वाखाणण्याजोगी राहिली आहे.

ज्या प्रभागाने मला राजकीय ओळख प्राप्त करून दिली त्या प्रभागातील नागरिक त्यांच्या हृदयामध्ये मला स्थान देतात. किंबहुना माझ्या प्रभागातील नागरिक म्हणजे माझे कुटुंब आहे असे मला वाटते, अशा भावना विक्रांत बाळासाहेब पाटील यांनी प्रकट केल्या.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## वाढत्या खड्ड्यांमुळे नागरिक बेजार, वाहतूक कोंडीने झाले हैराण

कुठून असा प्रश्न उपस्थित होतो. भगतवाडी-चिपळे येथील सर्व रस्ताच खड्ड्यांनी भरलेला असल्यामुळे वाहनांचे प्रचंड नुकसान होत आहे. खड्ड्यात अनेकदा वाहने आपटल्यामुळे पाठीमागील वाहन येऊन पुढील वाहनाला धडकते. व त्यात अपघात होतो. मात्र प्रशासन अद्याप जागे झालेले नाही. दिवसातून दहा ते बारा वेळा प्रवासी घेऊन जाणारे इको व तीन चाकी रिक्षा चालक या खड्ड्यांना पुरते वैतागले आहेत. एखाद्याचा जीव गेल्यावर नवीन पनवेल उड्डाणपूल, भगतवाडी आणि चिपळे येथील खड्डे प्रशासन भरणार का असा सवाल रिक्षाचालक, इको चालकांनी विचारला आहे.

रस्त्यावर पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे वाहनांचा वेग कमी होतो. त्यामुळे संपूर्ण उड्डाणपूलावर वाहनांची मोठी रांग लागते. मात्र प्रशासनाला काहीही देणे घेणे नाही. पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणावर वाहनांची रेलचेल आहे. गाडीचा टॅक्स घेऊन सुद्धा जर रस्ते चांगले मिळत नसतील तर काय फायदा असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाला आहे. येथील खड्ड्यांच्या विरोधात नागरिक आंदोलन करण्याच्या पवित्र आहेत.


## ग्रामपंचायत केळवणे

**ता.पनवेल, जि.रायगड**

## निविदा सूचना

सर्व बांधकाम रजिस्टर ठेकेदारास जाहीर निविदाद्वारे कळविण्यात येते की,ग्रामपंचायत केळवणे ता-पनवेल जि रायगड येथे १५ वित्त आयोग सन २०२०/२१ व २०२१/२२अंतर्गत खालील कामे मंजूर करून ग्रामपंचायत केळवणे या खालील कामांकरिता इच्छुक ठेकेदारांकडून मोहोरबंद लिफाफा निविदा मागविण्यात येत आहेत. तरी ज्या रजिस्टर ठेकेदारांना सदरची कामे करावयाची आहेत त्यांनी आपल्या निविदा दिनांक १७/०९/२०२२ ते दि.२३/०९/२०२२ सकाळी ठीक ११.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात सादर करावी. प्राप्त निविदा दि.२३/०९/२०२२ रोजी दुपारी ठीक १२ :०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येईल.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकाची रक्कम | १% इसारा रक्कम | निविदा फी | कामाचा कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | केळवणे कातकरवाडी पाणीपुरवठा करणे. | २५०००० | २५०० | १०० | ६ महिने | १५ वित्त आयोग |
| २ | मोकळ आली येथे ६ शीट शौचालय बांधणे. | २००००० | २००० | १०० | ६ महिने | १५ वित्त आयोग |
| ३ | जुनी आली येथे ६ शीट शौचालय बांधणे. | २००००० | २००० | १०० | ६ महिने | १५ वित्त आयोग |
| ४ | सार्वजनिक शौचालय दुरुस्ती करणे | २००७१८ | २००७ | १०० | ६ महिने | १५ वित्त आयोग |
| ५ | ग्रामपंचायत हद्दीतील अंगणवाडया दुरुस्ती रंगरंगोटी करणे. | ६०००० | ६०० | १०० | ६ महिने | १५ वित्त आयोग |
| ६ | रविंद्र गणा गायकवाड यांच्या घरापासून ते जयश्री कोळी यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | २५०००० | २५०० | १०० | ६ महिने | १५ वित्त आयोग |
| ७ | बौद्धवाडा समाजमंदिर येथे विजेची व्यवस्था व फिटिंग करणे. | ७४९४५ | ७४९ | १०० | ६ महिने | ग्राम निधी |

**अटी व शर्ती**

१. सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत ग्रा.प कार्यालयामध्ये पहावयास मिळतील.
२. साहित्याबाबत आवश्यकत सविस्तर माहीती ग्रा.प कडून घेऊन दरपत्रक पाठविण्यात यावे.
३. प्राप्त निवीदा २३/०९ /२०२२ रोजी दुपारी ठीक १२ :०० वाजता ग्रा. प केळवणे येथे मा.सरपंच यांच्या समक्ष उघडण्यात येतील.
४. सदर कामाचे देयकास ॲडवान्स रक्कम अदा केली जाणार नाही
५. नोंदणी कृत ठेकेदारांना प्राधान्य देण्यात येईल .
६. सदरील मंजुरी नंतर सहा महिनांच्या आत पूर्ण करण्यात यावीत.
७. प्रत्येक देयकातून शासन नियमाप्रमाणे करांची रक्कम कपात केली जाईल .
८. सदरची कामे अंदाजपत्रकाप्रमाणे मा.गटविकास अधिकारी पंचायत समिती पनवेल उप अभियंता बांधकाम विभाग यांच्याकडील तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली व देखरेखेखाली करावयाची असून काम समाधानकारक नसेल तर ते काम त्याच स्तिथीत थांबवून कार्यारभ आदेश रद्द करण्याचा अधिकार - ग्रा .प ने राखून ठेवली आहेत.
९. कोणतीही एक अथवा सर्व निवीदा कोणतीही कारण न देता नाकारण्याचा अधिकार सरपंच ग्रा .प केळवणे यांस राहील.
१०. सविस्तर आटी व शर्ती करिता ग्रामपंचायत कार्यालय यातले संपर्क साधावा सदरच्या सर्व अटी मान्य असणा यांनी निवीदा भरावी.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत केळवणे**
**ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत केळवणे**
**ता.पनवेल, जि.रायगड**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## नवीन पनवेलमधील पिल्लई महाविद्यालयाला मनविसेचे निवेदन

**दै.रायगड नगरी । उरण**

नवीन पनवेलमधील पिल्लई महाविद्यालयामध्ये उशिरा फी भरल्यास त्यावर दंड आकारण्यात येणार होता. याविरोधात मनविसेने निवेदन देत दंड आकारल्यास आंदोलन करणार असल्याचा ईशारा विद्यार्थी सेनेचे पनवेल महानगर अध्यक्ष अनिकेत मोहिते यांनी दिला आहे. पिल्लई महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाची फी १५ सप्टेंबर या तारखेनंतर भरल्यास त्या फी वर महाविद्यालय प्रति दिवस १०० रुपये दंड म्हणून आकारणी करणार असल्याची माहिती मनविसेचे अनिकेत मोहिते यांना समजली. ही तक्रार महाराष्ट्र नवनिर्माण सेना व विद्यार्थी सेनेला कळताच महाविद्यालयामध्ये प्राध्यापक वर्गासोबत चर्चा करण्यात आली. व त्याना निवेदन देण्यात आले. महाविद्यालयाकडून आकारण्यात आलेला प्रति दिवस १०० रुपये दंड घेणार नाही, असे प्राध्यापकांनी आश्वासन दिले. मनविसेतर्फे करण्यात आलेली मागणी मान्य करण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी तानाजी पिसे, मंदार गोसावी, आयुष घार्गे, प्रथमेश गवळी, रोहन गवळी, हर्षल सोनावणे, चंद्रकांत सकट आदी पदाधिकारी उपस्थित होते.

**सर्व प्रकारच्या जाहिरातींचे उत्तम माध्यम**
**दैनिक रायगड नगरी**
**9619979706 / 9619737911**

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# ई-रिक्षाच्या पायलट प्रोजेक्टला १५ ऑक्टोबर पासून होणार सुरुवात

## ई रिक्षामुळे घडणार पर्यटन क्रांती : स्थानिकांना विश्वास

**दै.रायगड नगरी । माथेरान**

ई रिक्षाच्या पायलट प्रोजेक्टला १५ ऑक्टोबर पासून सुरवात होणार असून सनियंत्रण समितीने सध्या या ठिकाणी एकूण सात ई– रिक्षा खरेदी करण्याची मान्यता माथेरान नगरपालिकेस दिल्याने माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार दि. १५ ऑक्टोबर पासून पायलट प्रोजेक्टला खऱ्या अर्थाने सुरवात होणार आहे. दस्तुरी नाका ते सेंट झेवीयर्स कॉन्व्हेंट शाळा या मार्गावर ही ई– रिक्षा सध्यातरी धावेल असे अधिकृतरित्या समजते आहे.त्यामुळे स्थानिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



मागील दहा वर्षांपासून यासाठी सातत्याने श्रमिक हातरीक्षा संघटनेचे सचिव सुनील शिंदेंनी पाठपुरावा केला आहे. इथल्या श्रमिकांना या अतिकष्टदायक प्रसंगातून ई रिक्षाच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने मुक्ती मिळणार आहे. माथेरान मध्ये याच अनुषंगाने विकासाची कवाडे खुली होणार आहेत. पर्यटकांची संख्या वाढत जाणार असल्याने आपसूकच सर्वांनाच रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मागील काही वर्षांपूर्वी अमन लॉज ते माथेरान स्टेशन दरम्यान मिनिट्रेनची शटल सेवा सुरू होणार म्हणून आपला रोजगार हिरावतो की काय अशी भीती अनेकांना वाटली होती परंतु पर्यटक वाढत गेल्याने सर्वांच्या व्यवसायात भर पडली आहे. त्याचप्रमाणे ई रिक्षा सुरू झाल्यास माथेरान मध्ये देशविदेशातील पर्यटकांची गर्दी आगामी काळात पहावयास मिळण्याची शक्यता आहे. आबालवृद्ध त्याचप्रमाणे ज्यांना माथेरान हे पर्यटनस्थळ पहावयाचे आहे अशांना ई रिक्षा वरदान ठरणार आहे.

मुख्यत्वे इथे वाहतुकीची गहन समस्या असल्याने यापूर्वी इथे ट्रॅव्हल्स कंपन्या बुकिंग घेत नव्हत्या परंतु पुढील काळात ही परिस्थिती निश्चितच बदलणार असून सर्व हॉटेल्स, लॉज धारक आणि अन्य व्यवसायिक यांनाही मोठया प्रमाणावर रोजगार उपलब्ध होणार आहे.

> दि १२ मे च्या सूनवाई दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला विचारले की माथेरानला ई रिक्षा सुरू करण्यासाठी राज्य सरकार कोणत्या स्वरूपाची उपाय योजना करीत आहे याची प्रतिज्ञापत्र द्वारे माहिती द्यावी त्यावेळी राज्य सरकारचे वकील राहुल चिटणीस यांनी सांगितले की, सरकारला तीन महिन्यांच्या पायलट प्रोजेक्ट सुरू करायचा आहे व कोणत्या कंपनीची ई रिक्षा सक्षमपणे चालू शकेल याचा अभ्यास करायचा आहे त्यानुसार कोर्टाने आदेश जारी केले त्याचीच पूर्तता केली जात आहे.
>
> **सुनिल शिंदे, याचिकाकर्ते तथा सचिव श्रमिक हातरीक्षा संघटना माथेरान**

# पालीत मोकाट गुरांचा सुळसुळाट ; मोकाट गुरांमुळे पालीकर हैराण

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यातील पाली नगरपंचायत हद्दीतील देऊळवाडी , बाजारपेठ, आणि हटाळेश्वर चौक. विभागात मोकाट जनावरांचा उच्छाद वाढल्याने नागरिक हैराण झाले आहे. याबाबत पालीतील ग्रामस्थांनी मागणी केली आहे कि मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्यात यावी. रात्रीच्या वेळेस ते रस्त्याच्या मधोमध बसले असल्याने अपघात अपघात हि झाले आहे.



या मोकाट गुरांचा कायमसुरूपी उपाययोजना करावी अशी मागाणी पालीती ग्रामस्थ करत आहेत

महाकाळी मंदिर परिसरआणि पालीसह संपुर्ण सुधागड तालुक्यात रस्त्यावर दिवस रात्र मोकाट गुरे ठाण मांडून असतात. जनावरांचे मालक व नगरपंचायत प्रशासनाचे पावसाळ्याचे दिवस असल्याने. गणपती मंदीर, हटाळेश्वर चौक मुख्य बाजारपेठ, याकडे लक्ष नसल्याचे दिसुन येत आहे. पाली परिसरातील रस्त्यांवर जनावरांची संख्या वाढली आहे.

जनावरे भाकड झाल्यानंतर त्यांना रस्त्यावर सोडून देण्यात येते. अशीच ही सोडलेली जना–वरे रस्त्यात कळपाने असल्याचे पहायला मिळत आहे. त्यात गुरांच्या झुंजी होताना दिसतात. मोकाट गुरांच्या वावरामुळे गल्लीबोळीत, रस्त्यावर शेणाचे साम्राज्य पसरल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. नगरपंचायत प्रशासनाने मोकाट गुरांना कोंडवाड्याचा रस्ता दाखवून ग्रामस्थांना त्रासातून मुक्त करावे. अशी मागणी ग्रामस्थ होत आहे.

# महिलेच्या हत्येमुळे रेल्वे स्टेशन परिसरात खळबळ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामावरून घरी परतत असलेल्या एका महिलेची नवीन पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात गळा चिरून हत्या केल्याची घटना गुरुवारी रात्री ११ ते ११.३० च्या दरम्यान घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

प्रियंका देवरतसिंग रावत (वय ३९ वर्षे, राहणार – महालक्ष्मी सिटी सोसायटी, विहिघर) हि गुरुवारी रात्री उशिरा कामावरून घरी परतत असताना नवीन पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात एका अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरून तिचा धारदार शस्त्राने गळा चिरून तो तिथून पसार झाला आहे.

या घटनेत सदर महिलेचा मृत्यू झाला असून याबाबत माहिती मिळताच खान्देश्वर पोलिसांचे पथक, पनवेल रेल्वे पोलिसांचे पथक आदींनी घटना स्थळी धाव घेतली आहे. सदर महिलेची हत्या का व कोणी तसेच कोणत्या कारणासाठी केली याचा शोध खान्देश्वर पोलीस करीत आहेत.

# १ लाख तरुणांना रोजगार देणारा प्रकल्प गुजरातला घालविणाऱ्या राज्य सरकारचा युवासैनिकांनी केला निषेध

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

वेदांत आणि फॉक्सकॉन यांच्या संयुक्तरित्या महाराष्ट्रात येऊ घातलेला प्रकल्प महाराष्ट्र राज्य सरकारच्या हलगर्जीपणामुळे गुजरातमध्ये गेला आणि त्यामुळे १ लाख तरुणांचा रोजगार देखील गेला. या गंभीरबाबी संदर्भात संपूर्ण महाराष्ट्रात युवासेने तर्फे युवासेना सचिव वरुण सरदेसाई यांच्या आदेशाने महाराष्ट्र राज्य सरकारच्या विरोधात निषेध मोर्चा व निषेध स्वाक्षरी मोहीम राबवण्यात आली. पाली सुधागड तालुक्यात देखील युवासेना रायगड जिल्हा विस्तारक सुधीर ढाणे व युवासेना रायगड जिल्हा अधिकारी सचिन डोबले यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच युवासेना सुधागड तालुका अधिकारी किरण पिंपळे यांच्या नेतृत्वाखाली सुधागड पाली येथे शेकडो युवासैनिक शिवसैनिक व तरुणांनी एकत्र येऊन १ लाख तरुणांचा रोजगार गुजरातला घालविणाऱ्या राज्य सरकारचा निषेध केला. निषेधार्थ राबविण्यात आलेल्या स्वाक्षरी मोहिमेत उत्स्फूर्तपणे सहभाग घेत सुधागड पाली तहसील कार्यालय पर्यंत जा–हीर निषेध मोर्चा काढण्यात आला. यावेळी पाली नायब तहसीलदार वैशाली काकडे यांच्याकडे त्या संदर्भातील निवेदन दिले. यावेळी युवासैनिकांनी ५० खोके राज्य सरकार ओके आणि महाराष्ट्राला धोके अश्या राज्य सरकार विरोधात जोरदार घोषणा देत महाराष्ट्र सरकारचा निषेध केला.



यावेळी शिवसेना रायगड जिल्हा उपसंघटक राजेंद्र राऊत, तालुकाप्रमुख मिलिंद देशमुख, माजी सभापती रमेश सुतार, महिला आघाडीच्या अश्विनी रुईकर, विभाग प्रमुख किशोर दिघे, शिव–सेना शहर प्रमुख ओमकार खोडागळे, युवासेना पाली शहर अधिकारी निखिल खामकर, युवासेना पाली सरचिटणीस यश हजारे, ज्येष्ठ शिवसैनिक अर्जुन हुले, रोहन राऊत, विद्वेश आचार्य, कुंभारशेत उपसरपंच किशोर खरीवले, मिलिंद शेळके,सोहम खोडागळे, अक्षय खोडागळे, मयूर देशमुख, तुषार ठोंबरे, सागर वाघमारे, जितू दळवी आदींसह शेकडो युवासैनिक शिवसैनिक व तरुण उपस्थित होते.

वेदांत आणि फॉक्सकॉन यांच्या संयुक्तरीत्या महाराष्ट्रात येऊ घातलेल्या सेमी कंडक्टर निर्मितीचा सुमारे पावणे दोन लाख कोटींचा प्रकल्प सरकारच्या हलगर्जीपणामुळे गुजरात मध्ये गेला यामुळे महाराष्ट्रातील सुमारे एक लाख तरुणांचा रोजगार गेला याशिवाय राज्यात मोठा प्रमाणात आर्थिक उलाढाल झाली असती राज्याला जीएसटीच्या माध्यमातून मोठा महसूल मिळाला असता त्याचा राज्याच्या विकासाला उपयोग झाला असता यामुळे राज्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. राज्याच्या हिताचा प्रकल्प परराज्यात जाऊ दिल्याबद्दल राज्य सरकारच्या या कृतीचा निषेध करत शासनाने त्वरित याची दखल घेऊन सदर प्रकल्प पुन्हा महाराष्ट्रात येईल असा प्रयत्न करावा अन्यथा या विरुद्ध आम्ही तीव्र आंदोलन करू असे युवासैनिकानी निवेदन शासनाला दिले आहे.

# शिंदे सरकारविरोधात पेणमध्ये शिवसेना, युवा सेनेची निषेध स्वाक्षरी मोहीम



**दै.रायगड नगरी । पेण**

महाराष्ट्रात येऊ घातलेला वेदान्त–फॉक्सकॉन प्रकल्प गुजरातमध्ये गेल्यामुळे राज्य सरकारवर टीका होत असून, आता शिवसेनेने राज्य सरकारच्या विरोधात निषेध स्वाक्षरी मोहीम सुरु असुन पेण मध्ये शिवसेना व युवा सेनेने निषेध स्वाक्षरी मोहीम पेण नगरपालिके समोर राबविली या वेळी शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख अविनाश म्हात्रे, शिवसेनेचे रायगडजिल्हा समन्वयक नरेश गांवड,शिवसेनेचे पेण तालुका प्रमुख जगदिश ठाकुर, युवासेनेचे पेण तालुका अधिकारी राकेश मोकल, युवासेनेचे पेण शहर अधिकारी चेतन मोकल, तुकाराम म्हात्रे आदि शिवसेनेचे युवासेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

वेदान्त–फॉक्सकॉन प्रकल्प गुजरातला नेवुन येथील जनतेची फसवणुक केली असुन येथील तरुणांचा रोजगार बुडविला असल्याने शिंदे सरकारचा निषेध करुन हा प्रकल्प बेकायदेशिर महाराष्ट्रा बाहेर नेला आहे तो पुन्हा महाराष्ट्रात आणावा महाराष्ट्रात येऊ घातलेला वेदांत आणि फॉक्सकॉन प्रकल्प खोके सरकारच्या हलगर्जीपणामुळे गुजरातमध्ये गेला. यामुळे १ लाख तरुणांचा रोजगार गेला. त्याच्या निषेधार्थ शिवसैनिकांनी तसेच महाराष्ट्रप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने या मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन शिवसेनेच्या युवासेनेच्या पदाधिका–यांनी यांनी या वेळी केले.

# मनसे पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना अध्यक्ष अमित राज ठाकरे यांच्या मार्गदर्शनानुसार पनवेल येथील मनसे पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. दिनेश काशिनाथ मांडवकर यांची पनवेल तालुका सचिवपदी, विश्वास पुंडलिक पाटील यांची पनवेल तालुका उपाध्यक्षपदी तर गुरुनाथ किशोर भोपी यांची दुन्द्रे विभाग अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

**अर्जदारातर्फे वकील : अनंत देवजी पाटील**

## जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्याया.सो.रायगड यांचे कोर्टात
मो.अप.क्लेम नं.६५/२०२१
नि.नं.१३/ड
ने.ता.०४/१०/२०२२

महेश सुभाष जाधव — अर्जदार
विरुद्ध
१) अयान टुर्स ॲण्ड ट्रव्हल्स
२) युनिर्व्हसल सोमपो जनरल इन्शुरन्स कं.लि. वगैरे — सामनेवाला

प्रति,
सामनेवाला नं.१
१) अयान टुर्स ॲण्ड ट्रव्हल्स
मु.७२२, जीआरडी राजीव गांधी नगर,
बेंगाली पुरा बीपीटी गेट नं.४,
अन्टॉपहिल वडाळा (इस्ट)
मुंबई, महाराष्ट्र ४०००३७

दि.२९/०३/२०२१ रोजी दुपारी ०३.०० वाजण्याच्या सुमारास मौजे : डिकसळ गावचे हद्दीत, सिद्धीविनायक हास्पिटलचे समोर, बदलापूर–कर्जत रोडवर, नेरळ पोलीस स्टेशन, ता.कर्जत, जि.रायगड यांच्या हद्दीत अपघात घडला. सदर अपघातामध्ये अर्जदार यांची आई शुभांगी सुभाष जाधव ही मयत झाली आहे. सदर अपघातामध्ये ॲक्सेंट कार क्र.एमएच–०१/सीजे २९४८ वरील चालक हे शुभांगी सुभाष जाधव यांच्या मरणास कारणीभूत ठरले आहेत. म्हणून अर्जदार यांनी सामनेवाला विरुद्ध अपघात नुकसान भरपाई मिळणेकरिता रु.१०,००,०००/– चा नुकसान भरपाईचा क्लेम अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायाधिकरण यांचे कोर्टात दाखल केला आहे.

तरी तुम्हांस जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुम्ही सदर अर्जाचे कामी या न्यायालयात दि.०४/१०/२०२२ रोजी सकाळी तुम्ही प्रत्यक्ष कायदेशीर वकीलांमार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे व आपला पत्ताही न्यायालयात सादर करावा. या मुदतीत आपण न्यायालयात हजर न राहिल्यास सदरहू अर्जाच्या कामी आपल्या विरुद्ध पुढील आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.०२/०९/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **जिल्हा न्यायालय** **रायगड–अलिबाग**
**(कोर्टाचा शिक्का)**
**सही/–** **अधिक्षक (न्याय विभाग)** **जिल्हा न्यायालय** **रायगड–अलिबाग**

श्री.मुजावर सो.कोर्ट

**ॲड.संपदा मोकल**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१२६९/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१९/१०/२०२२

श्री.प्रसिता प्रकाश पाटील वगैरे १ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार श्रीमती.प्रसिता प्रकाश पाटील व श्री.हर्षद प्रकाश पाटील यांनी उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे न्यायालयात कै.प्रकाश नारायण पाटील यांचे वारस म्हणून वारस दाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केला आहे. कै.प्रकाश नारायण पाटील यांचे दि.२७/१०/२०२१ रोजी रा.नवीन शेवा, ता.उरण, जि.रायगड येथे त्यांच्या राहत्या घरी निधन झाले. तसेच त्यांचे वडील कै.नारायण गणपत पाटील यांचे दि.१८/०४/२००४ रोजी व त्यांची आई कै.लक्ष्मी नारायण पाटील यांचे दि.०५/०४/२०११ रोजी निधन झाले असून, त्यांच्या मृत्यूची नोंद सरकार दप्तरी झालेली आहे. कै.प्रकाश नारायण पाटील यांचे मालकीच्या मौजे : द्रोणागिरी, ता.उरण, जि.रायड येथे खालील वर्णनाच्या स्वकष्टार्जित मिळकती होत्या.

**मिळकतींचे वर्णन**

**१) मौजे : द्रोणागिरी, ता.उरण, जि.रायगड**
**स्काय क्रिस्टा, भूखंड क्र.१२३, सेक्टर ५०, सदनिका क्र.३०१, तिसरा मजला, क्षेत्र–२४.७५७ चौ.मी.**
**२) मौजे : द्रोणागिरी, ता.उरण, जि.रायगड**
**स्काय कॅनेरी, भूखंड क्र.१३१, सेक्टर ५०, गाळा क्र.०१, तळमजला, क्षेत्र १४.६३१ चौ.मी.**

त्याअर्थी सदर मिळकतीचे वारसा हक्काबाबत कोणाची हरकत, अधिकार अथवा वारसा असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपल्या हरकती या न्यायालयाकडे योग्य त्या पुराव्यासह सादर करावयात.

सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून योग्य त्या मुदतीत कोणाच्या हरकती न आल्यास, कोणाचीही हरकत नाही असे समजून अर्जदारांस वारस दाखला देण्यात येईल. मागाहून आलेल्या कोणत्याही तक्रारींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२५ माहे ०८/२०२२ रोजी आमच्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यासह दिले.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**
**(कोर्टाचा शिक्का)**
**सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

वाघमारे सो.कोर्ट

**अर्जदारातर्फे वकील**
**श्री.पी.एस.वासकर**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१२४७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१८/१०/२०२२

१) श्रीमती.चांगुणा भरत पाटील
वय : वर्षे, धंदा : शेती
२) श्री.मिथुन भरत पाटील
वय : वर्षे, धंदा : शेती
३) कु.नितीन भरत पाटील
वय : वर्षे, धंदा : शेती
१ ते ३ रा.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.प्रतिक्षा प्रकाश पाटील
वय : वर्षे, धंदा : शेती
रा.भोम, ता.उरण, जि.रायगड
५) सौ.नुतन विश्वनाथ वासकर
वय : वर्षे, धंदा : शेती
रा.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड
६) सौ.निशा जितेंद्र पाटील
वय : वर्षे, धंदा : शेती
रा.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड
७) सौ.मेणका भरत गोसावी
वय : वर्षे, धंदा : शेती
रा.भंगारपाडा, ता.पनवेल, जि.रायगड
८) सौ.सीमा सुरेश मढवी
वय : वर्षे, धंदा : शेती
रा.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, कै.भरत गजानन पाटील हे दि.२८/०४/२०२१ रोजी मौजे : कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. श्रीमती.सुलोचना गोपाळ पाटील... वगैरे हे त्यांचे खालील मिळकतीचे मोबदल्यात मिळणाऱ्या २२.५% भूखंडासंबंधी कायदेशीर वारसदार आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| नोड | सेक्टर नं. | भूखंड नं. | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| पुष्पक | ८ | ४४ बी | ५९० |
| पुष्पक | ८ | ६१ | ४५० |

कै.भरत गजानन पाटील यांचे नावे सहहिश्श्यात असलेल्या मौजे : कुंडेवहाळ, ता.पनवेल येथील शेतजमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**जमिनीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| कुंडेवहाळ | ८० | १ | ०–०५–१०<br>०–००–३० | ०–१९ |

श्रीमती.चांगुणा भरत पाटील... वगैरे हे कै.भरत गजानन पाटील यांचे कायदेशीर वारसदार आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आंत घ्यावी. मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलामार्फत हजर होवून हरकती घ्याव्यात जर ह्या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती न आल्यास हे मे.कोर्ट श्रीमती. चांगुणा भरत पाटील... वगैरे ह्यांच्या हक्काबद्दल पुरावा घेणेची कार्यवाही करेल व ते जर कै.भरत गजानन पाटील यांचे वारसदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१५/०९/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**
**(कोर्टाचा शिक्का)**
**सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## रेवस जेट्टी रखडल्याने रो- रो ची प्रतीक्षा

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण ते अलिबाग या सागरी मार्गावरील उरण मधील करंजा ते अलिबागच्या रेवस या दोन बंदरा दरम्यान रो–रो सेवा सुरू करण्यासाठी पाच वर्षांपूर्वीच करंजा जेट्टी ची उभारणी करण्यात आली आहे मात्र या मार्गाला जोडणाऱ्या अलिबाग मधील रेवस जेट्टिचे काम रखडल्याने ही सेवा सुरू होण्यास अडथळा निर्माण झाला आहे ही सेवा लवकरात लवकर सुरू करण्यात यावी अशी मागणी दोन्ही तालुक्यातील प्रवासी व नागरिकांकडून केली जात आहे. उरण व अलिबाग या दोन तालुक्यात दरम्यान चार किलोमीटरचे सागरी अंतर असून अनेक वर्षापासून या मार्गावरून प्रवास करण्यासाठी छोट्या बोटीचा (तरीचा) वापर केला जात आहे. ही सेवा अपुरी असल्याने या सागरी मार्गावर रो रो सेवा सुरू करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने तयार करून कामाला सुरुवात केली त्यानुसार २५ कोटी रुपये खर्च करून उरणच्या करंजा बंदरात रो रो ची स्वतंत्र जेट्टी तसेच तिकीट घर कार्यालय व वाहनतळ आदींची उभारणी करण्यात आली आहे. मात्र अलिबाग मधील रेवस जेट्टीचे काम अपूर्ण असल्याने ही सेवा रखडली आहे दरम्यान रेवस जेट्टीचे काम सुरू असल्याची माहिती मेरीटाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.

## वाकण - पाली मार्गावर आयसर टेम्पोंला अपघात

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

वाकण – पाली महामार्गावर पाली येथे बिसलरी पाणी बॉक्स घेऊन जाणा–या आयसर टेम्पो चालकानचे गाडीवरून नियंत्रण सुटल्यामुळे गाडी साईडपट्टीवरुन खाली उतरल्यामुळे अपघात झाला. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. हा अपघात शुक्रवारी (दि.१६) रोजी पहाटे घडला.

उपलब्ध झालेल्या माहितीनुसार वाकण बाजुकडुन पालीच्या दिशेकडे बिसलरीच्या बॉटल घेऊन जाण–ारा आयसर टेम्पों जंगली पीरच्या समोर आली असता गाडीचालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्यामुळे गाडी साईडपट्टीवरुन घसरुन बाजुला असलेल्या छोट्या नाल्यामध्ये अर्धवट स्थितीत पलटी झाली. जर का हिच गाडी रस्त्याच्या विरुद्ध बाजुला पलटी झाली असती तर गाडी दहा ते पंधरा फुट खाली नदीमध्ये कोसळुन मोठा अपघात घडला असता. पंरतु दैव बलवत्तर म्हणून या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. मुसळधार पाऊस सुरू असल्यामुळे टेम्पोत बाजुला करण्यासाठी अडथळा येत होता परंतु पाऊस कमी झाल्यानंतर काही तासाने क्रेनच्या मदतीने हा टेम्पो बाजुला करण्यात आला.

# श्रीवर्धनमधील नुकसान ग्रस्त मदतीच्या प्रतिक्षेत

## तात्काळ मिळणाऱ्या मदतीची माहिती देण्यास अधिकाऱ्यांची टाळाटाळ

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन परिसरात एक महिन्यापुर्वी वादळी संकट येऊन मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अतिवृष्टीमुळे नुकसान ग्रस्तांना तात्काळ मदत मिळेल असे शासनाकडून जाहीर करण्यात आले. मात्र, या नुकसान ग्रस्तांना भरपाईची मदत अद्याप मिळाली नाही. परिणामी सध्या होत असलेल्या परतीच्या पावसात प्रचंड हाल होत आहेत.

तालुक्यात ९ ऑगस्ट रोजी चक्रीवादळामुळे अनेक ठिकाणी नुकसान झाले. काहींचे कौलारू छप्पर कोसळले तर काहींना आपल्या व्यवसायिक साहित्य पाण्यामुळे खराब झाल्याने मोठया प्रमाणात आर्थिक नुकसानीचा फटका बसला आहे. त्यामुळे अनेक या वादळातील नुकसान ग्रस्त अद्याप मदतीच्या प्रतीक्षेत आहेत. सोमवारपासून सुरु झालेल्या अतिवृष्टीमुळे येथील नुकसान



ग्रस्त कुटुंबावर वादळी संकट आले आहे. मात्र, या कुटुंबाला अद्याप कोणतीच मदत मिळाली नसल्याने सद्या होत असलेल्या पावसात अवस्था बिकट आहे. त्यामुळे शासनाने दिलेली मदत शेवटच्या माणसापर्यंत पोहोचण्यासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधीचे प्रयत्न अपुरे ठरत आहे हीच बाब पुन्हा सिद्ध होत आहे. नैसर्गिक आपत्ती विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार यंदा तालुक्यातील अंदाजे १८ घरे आणि ८ गोठ्यांचे नुकसान झाल्याचे समजते. यातील किती नुकसान ग्रस्तांना मदत मिळाली याची प्रस्तुत प्रतिनिधीने विचारणा केली असता अधिकाऱ्यांकडून माहिती नसल्याचं उत्तर मिळत आहे. वादळातील ग्रामस्थांना नुकसान भरपाई मिळावी यासाठी तत्काळ पंचनामे करण्यात आले. परंतु आद्यापी काही नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई प्राप्त झाली नाही. मात्र, तलाठी, तहसील कार्यालय आणि बँकातून सर्वसामान्यांचे हेलपाटे सुरूच आहेत. आता नुकसानग्रस्तांना मदत कधी मिळणार याची प्रतीक्षा आहे. प्रशासनाकडून लवकरात लवकर मदत मिळावी. अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

# परतीचा पाऊस की ढगफुटी धो धो कोसळणाऱ्या पावसाने पिकांचे नुकसान बळीराजा धास्तावला

**दै.रायगड नगरी । गोवे–कोलाड**

रायगड जिल्ह्यात गेली आठवडाभर धो धो कोसळणाऱ्या पावसाने अतिवृष्टी निर्माण केली हा परतीचा पाऊस की ढगफुटी आहे की काय असा प्रश्न निर्माण झाला आहे अनेक ठिकाणी महापुरपरिस्थिती निर्माण केली गेली आहे शेकडो हेक्टर भात शेती पाण्याखाली गेली पिकांच्या नुकसानिमुळे बळीराजा पूर्णतः धास्तवला असल्याचे दिसून येत आहे धो धो कोसळणाऱ्या पावसामुळे व त्या पाण्याच्या प्रवाहामुळे भात शेती सह काही पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे त्यामुळे बळीराजा शेतकरी धास्तवला गेला असून त्याची चिंता वाढली आहे.

खरीप हंगामा भातशेती बरोबरच काही वर्कस पट्यातील शेतकरी पावसाळ्यात हे नाचणी वरी व काही विविध भाजी लागवड करत त्याचे पीक घेत असतात परंतु गेली अनेक दिवस विजांच्या कडकडाटने पावसाची सुरवात झाली आणि थैमान घातलेल्या या पावसात हे सारे पीक हे जमिनीत गाढले गेले असल्याचे दिसून येत आहेत त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास आता वरून



राजा हिरावून घेतो की काय या चिंतेने बळीराजा शेतकरी धास्तवला आहे .

मागील दोन वर्षे कोरोना काळात याच शेतकऱ्यांनी सर्वांना तारले त्यांनी कोणतीही भीतीची तमा न बाळगता आपल्या शेतीत पिकांची लागवड करत धान, धान्य, भाजी पुरविली आणि याच बळीराजावर आशा धो धो कोसळणाऱ्या पावसामुळे व पर्जन्यमानवृष्टीमुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ येते की काय असा प्रश्न डोळ्यासमोर उभा राहिला आहे. रायगड जिल्ह्यात हवामान खात्याने केलेल्या अंदाजानुसार पाऊस पुन्हा दमदारपणे सक्रिय झाला असून रोहा, माणगाव, पेण, सुधागड, अलिबाग, सह अन्य तालुक्यात व विभागांमध्ये जोरदार पाऊस पडत आहे. यामुळे पुन्हा धबधबे व धरण ही ओसंडून वाहत आहे. परिसरातील लहान नाले, नद्या सुद्धा पावसाच्या पाण्याने ओसंडून वाहत असून शेकडो हेक्टर भातशेती ही पाण्याखाली गेल्याने बळीराजाला पीक नुकसानीची चिंता लागली आहे.

या आधीच शेतकरी बळीराजा प्रचंड वाढलेल्या महागाईत त्रासाला आहे या ना त्या कारणाने ग्रासला आहे केंद्र सरकार व राज्य सरकाने या करता ओला दुष्काळ जाहीर करून नुकसानभरपाई जाहीर करावी अशी मागणी जाहीररीत्या सर्व शेतकरी बांधवांकडून होत आहे.

तर गौरी गणपती उत्सव काळात काही दिवस पावसाने विश्रांती घेतली होती त्यामुळे अनेक नागरिक कामासाठी तसेच खरेदीसाठी बाहेर पडले होते. त्यामुळे कोलाड, धाटाव, रोहा, चणेरा, विळा येथील बाजारपेठा नागरिकांनी फुलल्या होत्या. मात्र तद्नंतर पाऊस पुन्हा जोमाने सक्रिय झाल्यामुळे हा परतीचा आहे की ढगफुटी आहे त्यामुळे बाजारपेठेत दिसणारी गर्दी देखील मंदावली आहे.

## सर्पमित्र संदीप घरतने दिले १० फुटी अजगरला जीवदान

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरूड शहरातील अलकापुरी येथे गजानन गाणार यांच्या घरात आलेल्या १० फुटी अजगरला सर्पमित्र संदीप घरत ने शिताफीने पकडून मुरुड पोलिसांच्या सहकार्याने रात्री उशिरा गारंबी जंगलात जाऊन सोडून दिले.

अलकापुर येथे गजानन गाणार यांच्या घरासमोर मध्यरात्री १२ वाजता अजगराला येताना शेजारी संकेत सतविडकर ने पाहीले अजगर घरात शिरत होता. त्यावेळी संकेत ने सर्पमित्र संदीप घरत यांना पाचारण केले. सर्पमित्र संदीप घरत ने तातडीने घटनास्थळी पोचले व गाणारांच्या घराच्या सर्पण ठेवण्याच्या खोलीत अडगळीत बसलेल्या अजगराला दिड तासाच्या अथक प्रयत्नाने पकडले. त्यावेळी वनखात्याच्या अधिकाऱ्यांना संपर्क साधला परंतु कोणिही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे रात्री पेट्रोलींग करिता असलेल्या मुरुड पोलिसांना संपर्क साधला असता पोलिसांनी तात्काळ सहकार्य करुन रात्री २:३० वाजता या अजगराला गारंबी जंगलात जाऊन सोडून दिले.

# एमजेपीच्या नियोजनशून्य कामांमुळे रस्त्यांची झाली चाळण

**दै.रायगड नगरी । माथेरान**

मागील काही वर्षांपासून इथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची कामे सुरू आहेत. नवीन पाणी जोडणी त्याचप्रमाणे अन्य कामे या प्राधिकरणाच्या माध्यमातून सुरू आहेत ती काही संपता संपत नाहीत. पाईप लाईनची कामे करताना अनेक ठिकाणी रस्त्यांची खोदाई केली जात आहे परंतु ज्या ज्या ठिकाणी रस्त्यांची खोदाई झालेली आहे ती जागा पूर्वावस्थेत न ठेवता तशीच असल्याने रस्त्यांची अक्षरशः चाळण झाल्याने रस्त्यावरून प्रवास करताना पादचाऱ्यांना मोठया अडचणींचा सामना करावा लागत आहे.

मुख्य रस्त्यावर रस्त्याच्या दुतर्फा पेव्हर ब्लॉकचे रस्ते आहेत. परंतु ठेकेदाराचे कामगार पाईप लाईनची कामे पूर्ण झाल्यावर त्या रस्त्याचे ब्लॉक न



लावता पुढील कामाला सुरुवात करीत आहेत त्यामुळे बहुतांश ठिकाणांचे रस्ते एमजेपी च्या कामगारांमुळेच ओबडधोबड केलेले आहेत. नुकताच गणेशोत्सव काळात मुख्य रस्त्यावरील प्राथमिक शाळेच्या समोरील रस्त्यात १०८ ही रुग्णवाहिका रुतून बसली होती त्यावेळेस नगरपरिषदेच्या प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी आपल्या नगरपरिषदेच्या अधिकारी आणि कामगारांमार्फत भर पावसात अग्निशमन दलाच्या गाडीच्या साहाय्याने खेचून ही रुग्णवाहिका बाहेर काढली होती. अशाप्रकारे गाव–ातील अनेक ठिकाणी या ठेकेदाराच्या कामगारांनी रस्ते खोदून ठेवले आहेत परंतु ते पूर्ववत करण्यात आलेले नाहीत.एकीकडे कुणाला घरगुती पाणी कनेक्शन घ्यावयाचे झाल्यास रस्त्याची खोदाई होते यासाठी नगरपरिषदेकडून खोदलेला रस्ता पूर्ववत करण्यासाठी ठराविक रक्कम अनामत स्वरूपात आकारली जाते.

परंतु संबंधीत ठेकेदाराने गा–वात अक्षरशः रस्त्यांची चाळण केलेली आहे त्याच्याकडून अनामत रक्कम जमा करण्यात आलेली नाही असे बोलले जात आहे. याकामी संबंधित ठेकेदाराकडुन सुरुवातीपासून ते आजमितीपर्यंतची दंडाच्या रक्कमे सोबतच अनामत रक्कम जमा करण्यात यावी अशी मागणी स्थानिकांमधून होत आहे.

# बीपीसीएल प्रशासन आणि वाहतूक पोलीसांच्या दुर्लक्षपणामुळे बिपीसीएल कंपनी समोर अपघात

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील भेंडखळ गावातील रहिवासी कॉ. राजेश ठाकूर यांचा काही दिवसापूर्वी बिपीसीएल कंपनी समोरच असलेल्या बेकायदेशीर पार्किंग मुळे दुर्दैवी अपघात झाला. त्यात त्यांचा मृत्यू झाला. या दुर्दैवी अपघातानंतर बीपी–सीएल आणि वाहतूक विभाग जागे होऊन काही दिवसांसाठी बेकायदेशीर पार्कींग हटवण्याचा दिखावा करण्यात आला होता. परंतु काही दिवसांनंतर पुन्हा बीपीसीएल प्रशासन आणि वाहतूक पोलीसांच्या आशिर्वादाने पुन्हा भेंडखळ येथील बिपीसीएल गेट समोर व आजूबाजूच्या परिसरात बेकायदेशीर पार्कींग सुरू झाली आहे. त्यामुळे अपघातांना आयतेच आमंत्रण मिळत आहे.

दि १५/९/२०२२ रोजी सकाळी आर पी आय उरण तालुका उपाध्यक्ष शिवाजी ठाकूर यांच्या समोर बीपीसीएल जवळ पुन्हा एकदा बस आणि सिलेंडर ट्रकचा अपघात झाला. सुदैवाने कोणतीही जिवितहानी झाली नाही. वाहतूक पोलिसांना खडसावल्या नंतर बेकायदेशीर पार्कींग हटवण्याचे काम चालू झाले. रात्री तर पुर्ण रस्ता या गाड्यांनी व्यापलेला असतो. वाहतूक पोलीस फक्त दुचाकी वाहनांवर कारवाई करण्यात मग्न असतात. मात्र बेकायदेशीर पार्किंग करणाऱ्या व अपघाताला कारणीभूत ठरणाऱ्या वाहनांवर कारवाई कधी होईल ? असा सवाल शिवाजी ठाकूर यांनी उपस्थित केला आहे. बीपीसीएल कंपनी गेट समोर व आजूबाजूच्या परिसरात अनेक वाहने वेडीवाकडी लावल्याने अनेकांचे अपघात होत आहे. बीपी–सीएल प्रशासन व पोलीस प्रशासन येथे एखाद्याचा अपघात होऊन बळी जाण्याचे वाट बघत आहे की काय असा सवालहि शिवाजी ठाकूर यांनी उपस्थित केला आहे. बीपीसीएल कंपनी गेटसमोर व आजूबाजूच्या परिसरात बेकायदेशीर पार्किंग बंद करून रस्ता मोकळा कसा होईल यासाठी वाहतूक पोलीस प्रशासन व बिपीसीएल कंपनी प्रशासनाने पुढाकार घ्यावा अशी मागणी आता जनतेतून होऊ लागली आहे.




# करंजा बंदराकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरावस्था

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील करंजा बंदर ते भेंडखळ खाडी किनारा रस्त्यावर पावसाळ्यात खड्डे पडल्याने वाहन चालकांना खड्ड्यातून मार्गक्रमण करताना त्रास सहन करावा लागत आहे. तरी सिडको प्रशासनाने सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम हाती घ्यावे अशी मागणी चाणजे ग्रुप ग्रामपंचायतीचे मा. सरपंच मंगेश थळी यांनी केली आहे.

करंजा परिसरातील सर्रास रहिवाशी हे द्रोणागिरी नोड, नवीमुंबई, पनवेल, उरण, पेण तसेच पुर्व विभागातील गांवात, कंटेनर यार्ड मध्ये ये– जा करण्यासाठी सिडकोने नव्याने निर्माण केलेल्या करंजा बंदर ते भेंडखळ खाडी किनारा या रस्त्याचा



वापर करत आहेत. त्यामुळे नागरीकांचा वेळ, पैसा ही वाचत आहे. परंतु सदर रस्त्यावर पावसाळ्यात खड्डे पडल्याने वाहन चालकांना खड्ड्यातून मार्गक्रमण करावा लागत आहे. त्यातच परतीच्या पावसात सदर रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असल्याने मोटारसायकल स्वारांना अपघाताचा व प्रवाशी नागरीकांना शारीरिक व्याधींचा सामना करावा लागत आहे.

तरी सिडको प्रशासनाने सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम हाती घ्यावे अशी मागणी माजी सरपंच मंगेश थळी यांनी केली आहे.

## ५६ हजारांची ऑनलाइन फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मोबाईलवर लिंक पाठवून ऑनलाइन रिसीव्ह नावाचे ॲप डाऊनलोड करण्यास सांगून त्याद्वारे ५६ हजारांची ऑनलाइन फसवणूक करण्यात आली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्वामी नित्यानंद रोड, पनवेल येथील विनोद गोविंद नेमण यांचा पनवेल बस स्टँड च्या पाठीमागे लक्ष्मी डिस्ट्रीब्यूटर या नावाने औषधाचा व्यवसाय आहे. त्यांनी काही औषधे युएसला पाठवले होते. त्यासाठी मोबाईल मधून गुगलवर जाऊन ऑनलाईन पनवेल येथील फेडेक्स कुरिअरचा नंबर शोधला. त्या नंबर वर कॉल केला असता ऑफिसच्या रिनयूएशनचे काम सुरू असून ऑफिस बंद असल्याचे सांगण्यात आले. व कुरिअर करण्याकरता एक लिंक पाठवून त्याने ऑनलाइन रिसिव्ह नावाचे प डाऊनलोड करण्यास सांगितले. व पाच रुपये फोन पे किंवा गुगल ॲपे ने पाठवण्यास सांगितले. फोन पे वरून समोरील इसमास विनोद यांनी पाच रुपये पाठवले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी तीस हजार व पाच मिनिटानंतर सव्वीस हजार असे एकूण ५६ हजार डेबिट झाल्याचा मेसेज विनोद यांना आला. फसवणूक होत असल्याचे लक्षात येताच त्यांनी त्यांच्या बँकेत जाऊन अकाउंट डिजिलॉक करण्यास सांगितले.


## पनवेल महानगरपालिका

**ता.पनवेल, जिल्हा : रायगड, पनवेल ४१०२०६**

दूरध्वनी कार्यालय : ०२२–२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं.०२२–२७४५२२३३

उपायुक्त कार्यालय : ०२२–२७४५५७५१ आयुक्त कार्यालय : ०२२–२७४५२३३९

ई–मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

जा.क्र.पमपा/आस्था/प्रमंआयो/३६२२/प्र.क्र.८/६८६/२२ दिनांक : १६/०९/२०२२

### थेट मुलाखत (Walk-in Interview) रद्द झालेबाबत.

प्रधानमंत्री आवास योजना सर्वांसाठी घरे अंतर्गत पनवेल महानगरपालिकेमध्ये नगररचना तज्ञ हे पद थेट मुलाखतीद्वारे भरणेबाबतची जाहिरात दि.०७/०९/२०२२ रोजी वर्तमानपत्रात प्रसिद्ध केली होती. परंतु, सदर पद भरती प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे सदर जाहिरातीद्वारे दि.१९/०९/२०२२ रोजी दुपारी ०३.०० वा. आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे होणारी मुलाखत प्रक्रिया सुद्धा रद्द करण्यात आली आहे. कृपया याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**उप आयुक्त (मुख्यालय)**
**पनवेल महानगरपालिका**



## कर्जत नगरपरिषद, कर्जत, जि.रायगड

### जाहीर सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या उक्त ८ (३) अन्वये या नोटीशीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडाचा प्रकार | झाड तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | गार्डेनिया को.ऑप.हौसिंग सोसायटी दहिवली | वड–०१ | धोकादायक असल्याने |
| २ | उमेश मनोहर मिसाळ, भिसेगाव | रायवळ–०१ | बांधकाम अडथळा होत असल्याने |
| ३ | राजाराम हरिभाऊ म्हात्रे, विठ्ठल नगर कर्जत | जाकरंदा–०१ | धोकादायक असल्याने |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्षा अधिकारी कर्जत नगरपरिषद इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही सुचना हरकती असल्यास ही जाहीर सुचना प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कळवावे.

**सही/–**
**मुख्याधिकारी तथा वृक्षाधिकारी**
**कर्जत नगरपरिषद, कर्जत**